# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ द्वारा संचालित विद्यापीठ)

(सामान्य प्रशासन)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी क्रमांक: कार्यालय : ०७१२–२५२२९९१, फॅक्स : ०७१२–२५५५७०१


क्रमांक : रातुमनावि/सा.प्र./१६/२४८०२

दिनांक : ०२ जानेवारी, २०१६

प्रति,

१. विद्यापीठ शैक्षणिक विभागांचे सर्व विभाग प्रमुख,
२. विद्यापीठ संचालित व संलग्नित महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य व संचालक

**विषय :– स्वच्छ भारत अभियानाचे ॲप डाऊनलोड करुन घेण्याबाबत.**

**संदर्भ:–** डॉ. रामनाथ सोनवणे, अति. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांचे पत्र क्र. ५२५/अति.आयुक्त/२०१६, दिनांक २७ डिसेंबर २०१६.

महोदय/महोदया,

आपणास कळविण्यात येते की, डॉ. रामनाथ सोनवणे, अति.आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांनी संदर्भिय पत्रान्वये, दिनांक ४ ते ७ जानेवारी २०१७ दरम्यान नागपूर शहरात स्वच्छ सर्वेक्षण स्वच्छ भारत अभियानांतर्गत होणार असल्याचे व या सर्वेक्षणाअंती देशातील ५०० शहरांचे स्वच्छतेच्या मापदंडानुसार मानांकन केले जाणार असल्याचे कळविले आहे. त्यामध्ये नागपूर शहराचे पहिल्या दहा क्रमांकात मानांकन होण्याच्या दृष्टिने विद्यापीठातील व महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना व विद्यार्थ्यांना स्वच्छ – MoUD ॲप डाऊनलोड करून घेण्याबाबत आवाहन करण्याचे त्यांनी कळविले आहे.

संदर्भिय पत्राची प्रत आपल्या सुलभ संदर्भासाठी पाठविण्यात येत असून विनंती करण्यात येते की, स्वच्छतेच्या मापदंडात पहिल्या दहा क्रमांकात आपल्या नागपूर शहराचे मानांकन होण्याच्या दृष्टिने आपल्या विभागातील/महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांना स्वच्छ भारत अभियानाचे ॲप डाऊनलोड करण्याबाबत सूचित करावे.

आपला

सहपत्र : वरील प्रमाणे

(पुरणचंद्र मेश्राम)
कुलसचिव